विषय :- महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समिती,
अधिनियम 1961 चे कलम 96 मधील
तरतुदीनुसार मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे
अधिकाराचे प्रत्यायोजन.

## नाशिक जिल्हा परिषद, नाशिक

### सामान्य प्रशासन विभाग

जा.क्र.साप्रवि/आस्था-6/245/2018
नाशिक दिनांक:- 04/06/2018

**वाचा :- 1. महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम 1961 चे कलम 96 (1)**
**2. या कार्यालयाकडील आदेश क्र.साप्रवि/आस्था-6/369/2017 दि.14.8.2017**
**2. मा.मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद,नाशिक यांचे मंजुर टिपणी दिनांक- :-02/06/2018**

## -: आदेश :-

1. महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम 1961 चे कलम 96 मधील तरतुदीनुसार प्रदान करणेत आलेल्या, मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे अधिकारांपैकी काही महत्वाचे अधिकार या आदेशान्वये प्रत्योजित करण्यात येत आहे. प्रत्यायोजन कार्यपध्दती बाबत पुढील कार्यवाही करणे अनिवार्य आहे. प्रशासकीय कामकाजाच्या सोईच्या दृष्टीने रकाना क्र.5 मधील नमूद अधिकारी संदर्भ क्र.2 नुसार जिल्हा परिषदेच्या अधिनस्त विविध विभागातील वर्ग-2 अधिकारी यांचे दोन माहिन्यापर्यंत रजा मंजुरीचे अधिकार अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,नाशिक यांना प्रदान करण्यात आलेले होते. सदर प्रत्यायोजित अधिकार या आदेशान्वये रदद करण्यात येत आहे.
2. सोबत जोडलेल्या विवरणपत्रानुसार प्रदान केलेल्या अधिकारांची अंमलबजावणी करतेवेळी यापूर्वीची कार्यपध्दती प्रचलित राहील.
3. या आदेशान्वये प्रदान करण्यांत आलेल्या अधिकारातील विषयांच्या अनुषंगाने प्रचलित शासन नियम, शासन निर्णय, शासन परिपत्रके, शासन पत्रे, शासन मार्गदर्शक सूचना इ. नियमावलीचा अभ्यास करुन, सदरचे प्रकरण नियमांत बसते किंवा नाही, याची खातरजमा झाल्यानंतरच मंजुरी देण्यात येईल. व पारित करण्यांत आलेल्या आदेशाची एक प्रत माहितीसाठी संबंधित संवर्गाच्या आस्थापना प्रमुखाकडे पाठविण्यात यावी.

प्रस्तुत आदेश स्थायी आदेश संचिकेत सामील करावा.

प्रस्तुत आदेशाची अंमलबजावणी, आदेशाच्या दिनांकापासुन करण्यांत यावी.

सोबत- विवरणपत्र

(डॉ.नरेश गिते,भाप्रसे)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद, नाशिक

**प्रत :- माहितीस्तव सविनय सादर.**

1.मा.अध्यक्षा ,जिल्हा परिषद,नाशिक.

2.मा.उपाध्यक्षा, जिल्हा परिषद, नाशिक.

3.मा.सभापती, विषय समिती, जिल्हा परिषद, नाशिक.

**प्रत माहितीसाठी व पुढील कार्यवाहीसाठी रवाना.**

1.अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद,नाशिक.

2.खाते प्रमुख (सर्व), जिल्हा परिषद, नाशिक.

3.गट विकास अधिकारी (उश्रे) पंचायत समिती, (सर्व)

4.गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती (सर्व)

5.उपअभियंता(लपा/इवद/ग्रापापु),जि.प.उपविभाग, (सर्व)

6.तालुका आरोग्य अधिकारी,पंचायत समिती, (सर्व)

7.बाल विकास प्रक्ल्प अधिकारी,एबावियो (सर्व)

**प्रत :- पुढील कार्यवाहीस्तव**

आस्थापना-1 सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद, नाशिक.

सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद, नाशिक यांचेकडील पत्र क्र.साप्रवि/आस्था-6/ /2018, दि. / /2018 चे विवरणपत्र)

महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समिती, अधिनियम 1961 चे कलम 96 मधील तरतूदीनुसार "मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे अधिकार प्रत्यायोजनाचे विवरणपत्र".

जिल्हा परिषद स्तर कार्यालय प्रमुख : मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, मा.अति.मुख्य कार्यकारी अधिकारी हे नियंत्रण अधिकारी असतील, सर्व संबंधित विभागप्रमुख.

पंचायत समिती स्तर कार्यालय प्रमुख : गट विकास अधिकारी, सहाय्यक गट विकास अधिकारी, बालविकास प्रकल्पाधिकारी, गट शिक्षणाधिकारी, वैद्यकीय अधिकारी, उप अभियंता (लपा/इवद/ग्रापापु),

| अ.नं. | अधिकार प्रत्यायोजनाचा प्रकार | कोणत्या प्राधिकारान्वये अधिकार मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांना प्राप्त झाले आहेत | कोणत्या अधिकारान्वये सदरचे अधिकार प्रदान करावयाचे आहेत. | अधिकार कोणत्या अधिकाऱ्यांना प्रदान करण्यांत येत आहेत. | प्रदान केलेल्या अधिकाराची व्याप्ती | अधिकार प्रदान करण्यांत आलेल्या प्रकरणी कार्यवाही करावयाचे नियम/ शेरा. |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| प्रकरण-1 | | | | | | |
| (आस्थापना विषयक बाबी) | | | | | | |
| रजा प्रकरणे मंजुरी बाबत. | | | | | | |
| 1 | रजा मंजुर करण्याचे प्राधिकार (सर्व प्रकारच्या रजा) | म.ना.से.रजा नियम 1981 च्या नियम 50 नुसार | म.जि.प. व पं.स. अधिनियम 1961 मधील कलम 96 (1) | मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद | खाते प्रमुख व त्यांचे अधिनस्त गट-अ व ब अधिका-यांचे 60 दिवसापर्यंतच्या रजा मंजुरीचे अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांना राहतील. | म.ना.से.रजा नियम 1981 च्या नियम 50 मधील तरतुदीच्या अधिन राहुन |

मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद, नाशिक